शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई-४०० ०३०

सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

विभागाची आवश्यकताः

शासनाच्या लेखा विभाग, लेखापरीक्षण व संगणकाचे विशेष ज्ञान व शासन स्तरावरील प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असलेल्या व शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अधिकाऱ्याची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग अंतर्गत एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी | आवश्यक अर्हता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| 1 | लेखा अधिकारी | लेखा विभाग, प्रशासन विभाग, लेखापरीक्षण व संगणकाचे विशेष ज्ञान असावे | १ |

अटी व शर्ती :-

१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन आदेश क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १०/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जास्तीत जास्त एक वर्षासाठी करण्यात येणार असून त्याबाबतचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी ही नियुक्ती राहील.

२) आयोगास आवश्यकता असलेली अर्हता धारण करणाऱ्या वय वर्षे ६५ च्या आतील सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे, लेखा विभाग, प्रशासन विभाग, लेखापरीक्षण व संगणकाचे विशेष ज्ञान तसेच प्रशासकीय कामाचा अनुभव असणे आवश्यक राहील.

४) आवश्यक अर्हता धारण करणा-या इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी सदर पदाकरीता विहित नमुन्यातील अर्ज कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलिखित करावा.

५) आवश्यक अर्हता धारण करणा-या उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज, सदर जाहिरात वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासून कार्यालयीन कामकाजाच्या ०७ दिवसाच्या आत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, ३ रा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत, वरळी मुंबई येथे कार्यालयीन वेळेत व्यक्तीशः अथवा पोस्टाद्वारे किंवा आयोगाच्या ईमेल mscpcr@gmail.com वर सादर करावी. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

६) आयोगास आवश्यक असलेली अर्हत्ता व अनुभव नसलेल्या अधिका-यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जावर विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

७) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल व त्याबाबतची नामिकासूची (पॅनेल) तयार केली जाईल. या सूचीतील योग्य उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगास राहील.

८) आयोगतील लेखा विभागा समवेत तसेच आवश्यकतेनुसार प्रसंगानुरुप अन्य ठिकाणी देखील कामकाज हाताळावे लागेल.

९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे आयोगाच्या अवर सचिव, सचिव, अध्यक्ष यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१०) सदर नियुक्तीच्या अनुषंगाने पारिश्रामिक व भत्ते आणि इतर अटी व शर्ती, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेश क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १०/०६/२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील

(वंदना पु. जैन)
अवर सचिव तथा प्रशासकीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग